भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.४०२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०५/२०१७

**१) संगनमत करुन घराच्या जागेचे कारणावरुन शिवीगाळ, भांडण करुन काठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २०/०५/२०१७ चे २०.३० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे पती राजु रामदास कोटरंगे वय ३० वर्ष रा. लाखांदुर प्लॉट यास घराच्या जागेचे कारणावरुन शिवीगाळ, भांडण करुन आरोपी क्र ३ याने फिर्यादीचे पतीचे डोक्यावर काठीने मारुन जखमी केल्याने जखमीचे पत्नीचे बयाणा वरुन पोस्टे. लाखांदुर येथे कलम ३२४,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) घराचे मागील दाराची साखळी तोडुन घरातील गोदरेज आलमारीचे कुलुप तोडुन सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी . :—**

दिनांक २०/०५/२०१७ ते २१/०५/२०१७ चे २२.०० ते ०५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हरीचंद्र सिताराम बावनकुळे वय ६५ वर्ष, रा. कुडेगाव हे घरा समोर कुंटुबासह झोपले असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे मागील दाराची साखळी तोडुन आत प्रवेश करुन गोदरेज आलमारीचे कुलुप तोडुन आलमारीत ठेवलेले २ सोन्याचे गोप १२ ग्रॅम, किंमती १७,०००/—रु. व नगदी २५,०००/—रु. असा एकुण ४२,०००/—रु. चा माल कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. चौधरी पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) घराचे मुख्य दाराचा कोंडा तोडुन घरात ठेवलेल्या कपाटाचे लॉकर तोडुन सोन्या चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १८/०५/२०१७ चे १६.३० ते २१/०५/२०१७ चे १४.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी महेन्द्र शिवलाल चोपकर वय ३२ वर्ष, रा. नेहरु वार्ड मोहाडी याने आपले घराचे मुख्य दाराला कुलुप लावुन परीवारासह लग्न कार्यक्रमाला बाहेर गावी गेले असतांना कोणीतरी अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेल्या लोखंडी कपाटाचे लॉकर तोडुन त्यात ठेवलेले १४ सोन्याचे मनगटया वजन ४.५ ग्रॅम, २ सोन्याच्या अंगठया वजन १ ग्रॅम, २ सोण्याचे गोप वजन २२ ग्रॅम, १ सोन्याची नथ वजन २ ग्रॅम, २ कानातील सोन्याचे झुमके वजन ३.५ ग्रॅम, २ नग सोन्याचे ताईद वजन १ ग्रॅम, चांदीचे कडे ५६ वजन २८० ग्रॅम, ३ चांदीचे गोप १५ ग्रॅम, १ चांदीचा करदोळा १० ग्रॅम, ४ चांदीच्या पायपट्टया वजन ८० ग्रॅम, व नगदी १३,०००/—रु. असा एकुण १लाख १२ हजार १००रु चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. मोहाडी येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे स्वत: व मागील बसणाऱ्या इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २१/०५/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान यातील जखमी फिर्यादी अमन धालीराम लुटे वय १९ वर्ष, रा. बेला हा आरोपीचे बजाज डिस्कव्हर मोटार सायकल वर मागील सिटवर बसुन बेला येथुन एन एच ०६ रोडने सालेभाटा येथे जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने निष्काळजीपणे चालवुन दुसऱ्या मोटार सायकला ओव्हर टेक करीत असतांना त्याचे गाडीचे संतुलन बिघडल्याने मोटार सायकल रोडच्या खाली जावुन पडल्याने मोटार सायकल स्वत: व फिर्यादीस जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून सरतर्फे फिर्यादी पोहवा टेंभुर्णे यांच्या रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मावाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. सतांपे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**५) शेतावरील कचरा जाळण्यासाठी आग लावल्याने तणसीचे ढिंग, जलावु काळया, पाण्याची ईलेक्ट्रीक मोटार जळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २१/०५/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील आरोपीने आपले शेतावर आग लावली असता ती आग जळत जळत पसरत फिर्यादीचे शेतावर येवुन फिर्यादीचे शेतावरील असलेले तणसीचे ढींग, जलावु काळया दोन बंडी, पाण्याची ईलेक्ट्रीक मोटार असा एकुण २२,०००/–रु. च्या मालाची नुकसान करुन आग न विझविता घरी निघुन गेला व हयगयीने कृत्य केल्याने फिर्यादी महेन्द्र धनराज गिरे वय ३२ वर्ष, रा. शिवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. आंधळगाव येथे कलम २८५,४२७ भांदवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. दिक्षीत पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**६) रात्री अंधरात आपले अस्तित्व लपवुन हस्तक्षेपीय गुन्हा करण्याच्या बेतात मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २१/०५/२०१७ चे ००.३० ते ०१.०० वा. दरम्यान यातील आरोपी हा रात्री अंधारात आपले अस्तित्व लपवुन संशयास्पंद स्थितीत लपत छुपत हस्तक्षेपीय गुन्हा करण्याचे बेतात फिरतांना मिळुन आला असता त्यास विचारपुस केली असता समाधान कारक उत्तर न देता उडवा उडीचे उत्तर दिल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. बावने यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**७) दारु पिवुन दारुचे नशेत आडवी तिडवी चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २१/०५/२०१७ चे १७.०० ते १७.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल दारु पिवुन दारूचे नशेत आडवी तिडवी चालवितांना मिळुन आल्याने त्यास थांबवुन तोंडाचा वास घेतला असता आंबट उग्र वास आल्याने पंचनामा कारवाई करुन त्याचे वैद्यकीय परीक्षण अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खडसे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**७) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक २१/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा, कारधा, साकोली व लाखणी येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५२ लिटर हातभट्टी किंमती ४८४०/–रु. ५ लिटर २२० मिली लिटर देशी दारु किंमती १५५०/–रु. असा एकुण ६३९०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २१/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.